# नाच रे मोरा

लहानपणी आई आपल्या बाळास जेवण भरवत असतांना, ते बाळ सतत हसतं खेळत रहाण्यासाठी त्याला भरवत असतांना एक घास काऊचा एक घास चिऊचा करत त्याला खेळवत असे. त्याला रंगीबेरंगी कपडे घालून ये रे ये बस रे मोरा, बाळ घाली चारा, चारा खा पाणी पी बाळाच्या डोक्यावरून भूर्रकन उडून जा. असे गाणे म्हणत असते. थोडे वर्षांनी ते बाळ मोठे झाले कि त्याला ती नाच रे मोरा आंब्याच्या बनात, नाच रे मोरा नाच. हे गीत म्हणते. हे ती कां करते तर मुलगा किंवा मुलगी पायात आवाज येणारी छोटे छोटे घुंगरु असलेली चांदीची साखळी आणि कमरेला चांदीची चैन घालते. हे करण्यामागे हेतु एकच असतो तो संगीताच्या नादात मुलांनी आनंदी रहावे.

संगीत हा जीवनाचा आत्मा आहे. लहानपणी त्या मुलाला कमरेत, पायात ते मुल हालचाल करत असते. व त्याला जीवनाची गोडी उत्पन्न होते. व ते मुल आई-वडिलांच्या प्रकृतीनुसार ऊंच, बारीक, जाड, गोरे, रहायला शिकते. मोठेपणी शालेय जीवन नंतर पदवीधर शिक्षण व नोकरी उद्योगधंदा करता करता १० वर्षानंतर स्वतःची व भावंडांची आई-वडिलांची जबाबदारी स्विकारत असते. वय वाढत जाते तसतसे त्याची ओळख नातेवाईक मामा, मामी, मावशी, आत्या व त्यांच्या मुलांचे नाते कळते. आपापल्या कर्मानुसार, वृत्तीनुसार तो वावरत असते. समाजात वावरत असतानाच गाण्याच्या स्पर्धेत भाग घेत आई-वडिलांची किर्ती वाढवते.

"नाच रे मोरा" हा मोर आहे तरी कसा, तर नवनाथांच्या पोथीत नाथ संप्रदायाला श्री भगवान शंकरांकडून मिळालेली संजीवनी विद्या मिळवण्यासाठी श्री स्वतः मोराचे रूप घेतले. गुरु आपली विद्या शिष्याला देत असतो. निरनिराळे पक्षी निरनिराळ्या आवाजात प्रणय करत असतो तर मोराचे हे स्वरूप लोभासवाणी असते. मोर अंडी घालत नसल्याचा ठराविक वेळी त्याच्या नयनातले पाणी लांडोर पित असते. मोराच्या ओरडण्याला केकावली म्हणतात. मोराला स्त्रीयांच्या पैठणी, साड्या यावर स्थान मिळाले. त्याचे डौलदार चालणे लोकांना आल्हाददायक वाटू लागले. हिन्दी सिनेमात गाणे हिट झाले "मेरे अंगनामे नाचे मोर, थैया थैया" पुन्हा अवधूताने हेच गाणे मराठीतुन केले, अंगणी माझ्या मनाच्या मोर नाचु लागले तर काही देवदेवतांनी मोराला स्वतः वहान केले. श्री. गजाननने तर त्याला मयुरेश्वर नावाने भूषविले.

त्या गजाननाला हा लेख अर्पण.




सौ. अनघा आपटे
सोनापार्क C/73
कोथरूड
mb. 9146398897